## स्थानिक गुन्हे शाखा, नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१०, E Mail - pilcbnskr@gmail.com


---

# प्रेसनोट

दिनांक :- १५/०७/२०१८

## एस.एम.बी.टी. हॉस्पिटल घोटी खुर्द येथे मा.पोलीस अधीक्षक सो यांचे हस्ते पोलीस दुरक्षेत्राचे उद्घाटन

---

वाडीव-हे पोलीस ठाणे अंतर्गत एस.ए.बी.टी. हॉस्पिटल, घोटी खुर्द येथे दिनांक १४ जुलै २०१८ रोजी नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो**. यांचे शुभहस्ते नवीन **पोलीस दुरक्षेत्राचे उद्घाटन** करण्यात आले. कार्यक्रम प्रसंगी एस.एम.बी.टी. ट्रस्टचे अध्यक्ष व **माजी महसुल तथा कृषी मंत्री मा. बाळासाहेब थोरात,** सिन्नर विधानसभा मतदार संघाचे **आमदार श्री. राजाभाउ वाजे**, विधान परिषदेचे **आमदार श्री. सुधीर तांबे,** तसेच परिसरातील ग्रामस्थ, राजकिय पदाधिकारी, पोलीस पाटील व हॉस्पिटलमधील प्रमुख डॉक्टर तसेच स्टाफ मोठया प्रमाणात उद्घाटन सोहळयास उपस्थित होते.

उद्घाटन सोहळयानंतर मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांनी मनोगत व्यक्त केले. घोटी खुर्द येथील एस.एम.बी.टी. हॉस्पिटल परिसर हा वाडीव-हे पोलीस ठाणेपासुन खुप दुर अंतरावर आहे. सदर ठिकाणावर वाडीव-हे पोलीस ठाणेपासुन येण्यासाठी सुमार एक तासाचा अवधी लागतो, त्यामुळे नागरीकांना त्रास होतो, म्हणुन या भागात एका पोलीस चौकीची गरज होती. त्यासाठी एस.एम.बी.टी हॉस्पिटल प्रशासनाचे मोलाचे सहकार्याने घोटी खुर्द परिसरात नवीन पोलीस दुरक्षेत्र स्थापन करण्यात आले असुन पोलीसांचे कामकाज सोपे होणार आहे तसेच नागरीकांची गैरसोयही दुर होणार आहे. एस.एम.बी.टी. हॉस्पिटल, घोटी खुर्द पोलीस दुरक्षेत्रावर वाडीव-हे पोलीस ठाणेकडील अधिकारी व कर्मचारी नियमित उपस्थित राहुन सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य तो बंदोबस्त तसेच नागरीकांचे तक्रारींचे निरसन करणार आहे. परिसरातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणतीही तक्रार असेल तर सदर दुरक्षेत्रातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेशी संपर्क साधावा.

सदर कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यवरांनी हॉस्पिटल प्रशासन व कामकाजाविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन एस.एम.बी.टी. ट्रस्टचे वित्तीय अधिकारी श्री. करपे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ.श्री. नाईक यांनी केले. नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांचेसह उपविभागीय पोलीस अधिकारी नाशिक ग्रामीण विभाग श्री. अतुल झेंडे, पोलीस निरीक्षक वाडीव-हे पो.स्टे. श्री. सुहास देशमुख व विभागातील पोलीस अधिकारी व कर्मचारी सदर कार्यक्रमास उपस्थित होते.